# कार्यालय, नागपूर महानगरपालिका
## धरमपेठ झोन क्रं. 2
हरणेमहिला समाज भवनाच्या मागे, गोकुळपेठ, नागपूर - 440010
दुरध्वनी क्रं. 07122565589, 07122567056
ई मेल आय डी –dharampethzone@gmail.com


स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

क्रमांक : 281/OW/AC-II/2025-26 दिनांक 25/10/2025

**अर्जदार :- श्रीमती शोभा विजयराम पांडे, रा. लक्ष्मीनगर नागपूर.**
**गैरअर्जदार :- श्री. आत्माराम तुळशीराम पांडे व इतर, रा. वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर.**

सदर्हु प्रकरणाबाबत अर्जदार यांनी दि. 01/10/2025 रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक, म.न.पा. नागपूर यांना गैरअर्जदाराबाबत अनधिकृत बांधकाम करीत असल्याबाबत अर्ज सादर केला. नागपूर महानगरपालिका, नागपूर, नगर रचना विभाग सुधारीत परिपत्रक क्र. नगर रचना/अनधिकृत बांधकाम/1373/2025 दि. 22/09/2025 अन्वये गैरअर्जदार व अर्जदार यांना दि. 24/10/2025 रोजी सकाळी 11.15 वाजता दोघांची सुनावणी सहा. आयुक्त यांच्या कक्षात ठेवलेली होती. त्याप्रमाणे गैरअर्जदार श्री. आत्माराम पांडे व साधवी तुळशीराम पांडे तर्फे आत्माराम पांडे उपस्थित होते.

अर्जदार श्रीमती शोभा विजयराम पांडे यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या सासूबाई श्रीमती सुशीला पांडे यांनी करून ठेवलेल्या मृत्युपत्रानुसार सदर मिळकती मध्ये हिस्सेदार श्रीमती शोभा विजयराम पांडे ह्या मालमत्ता पत्रकानुसार त्यांचे नाव दर्ज आहे. त्यानुसार त्यांच्या मालमत्तेवर अनधिकृत बांधकामा विषयी तक्रार केलेली आहे. त्यामुळे अनधिकृत असलेले बांधकाम काढण्यात यावे. अशी विनंती केलेली आहे व त्यांच्या हिस्या बाबत मिळकत मिळावी अशी विनंती केलेली आहे. सदर भुखंड हे रहिवासी उपयोगाकरीता असल्याने त्यात वानजिक वापर करू नये. अशी त्यांची विनंती आहे.

गैरअर्जदार आत्माराम पांडे व इतर त्यांचे म्हणणे नोंदवून घेतले.

गैरअर्जदार यांना जा. क्र. 912/OW/AC-II दि. 03/10/2025 रोजी आपल्या मालकीहक्काचे कागदपत्र सादर करण्याचे पत्र देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी सुनावणी वेळी सादर केलेल्या कागदपत्रासोबत मंजुर नकाशा सादर केला मात्र तो वाचण्यायोग्य नाही.

भुखंड क्र. 225/अ, मौजा गाडगा, गोकुळपेठ, नागपूर येथील गैरअर्जदार श्री. आत्माराम तुळशीराम पांडे व इतर यांनी **अनधिकृत बांधकाम** आदेश मिळल्याच्या 15 दिवसाच्या आत स्वत:च्या **खर्चाने काढून टाकावे.** आपण आपले अनाधिकृत बांधकाम आपण स्वत: काढले नसल्यास नागपूर महानगरपालिका, नागपूर, नगर रचना विभाग सुधारीत परिपत्रक क्र. नगर रचना/अनधिकृत

Scanned with OKEN Scanner

बांधकाम/1373/2025 दि. 22/09/2025 अन्वये नागपूर महानगरपालिकेतर्फे पुढील कारवाई करून काढून टाकण्यात येईल व याचा सदर्हु खर्च आपणकडून वसूल करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

## आदेश :-

गैरअर्जदार श्री. आत्माराम तुळशीराम पांडे व इतर, रा. गोकुळपेठ नागपूर यांनी अनधिकृत असलेले बांधकाम तळ मजल व पहील्या मजल्यावरील मिळून एकुण 335.43 चौ. मी आहे. हा आदेश मिळल्याच्या 15 दिवसाच्या आत स्वत:च्या खर्चाने काढून टाकावे व तसा अहवाल या कार्यालयात सादर करावा अन्यथा नागपूर महानगरपालिकेतर्फे अनधिकृत बांधकाम काढण्याची कारवाई करण्यात येईल त्या कारवाई करिता लागणारा संपूर्ण खर्च आपलेकडून वसूल करण्यात यईल याची नोंद घ्यावी.

सहाय्यक आयुक्त
धरमपेठ झोन क्र. ०२
म.न.पा. नागपूर

**प्रतिलीपी सविनय सादर:-**

1. मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर, सिव्हील लाईन्स, नागपूर.
2. मा. जिल्हाधीकारी, जिल्हाधीकारी कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर.

प्रत :-

३. श्रीमती शोभा विजयराम पांडे, रा. लक्ष्मीनगर नागपूर.
४. श्री.आत्माराम तुळशीराम पांडे व इतर, रा. वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर.

Scanned with OKEN Scanner

कार्या

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## विभागिय कार्यालय, धरमपेठ झोन क्र. २

नोटिस क्र. मनपा/ससंनर/मप्रावनर/कलम 53(1)/ 587 दिनांक 27/10/2025

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 53(1) अंतर्गत नोटीस**

Nagpur NSH 440001
JM217181521IN, IVR No:1, 1800266868
03-11-2025 17:38:32, Counter No:2
To: SAADHVI T PANDEY
GOKULPETH NAG, NAGPUR, 440010
From: SAH AYUKT DHARMPETH ZONE,
GOKULPETH NAG, NAGPUR, 440010
Base Amt: 19.00
To: SAADHVI T PANDEY
I.Mode: -OF
POD:No, www.indiapost.gov.in

प्रति,

1) श्री आत्माराम पांडे,
2) श्रीमती साधवि तुळशीराम पांडे,
रा. प्लॉट नं. 225A, वेस्ट हायकोट रोड,
न.भु.क्र. 1123, घर क्र. 242, गोकुलपेठ नागपुर

ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना आधिनेयम, 1966 (यापुढ ज्याचा "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे.) चे कलम 2 (15) सह2 (19) नुसार नागपुर महानगरपालिकेला स्थानिक प्राधिकरण व नियोजन प्रधिकरण म्हणुन प्राधिकृत करण्यात आलेले आहे व उक्त अधिनियमातील कलम 152 (1) नुसार मा. निगमायुक्त किंवा त्यांनी प्रत्यायुक्त केलेल्या अधिकारी/अधिकाऱ्यांनी उक्त अधिनियमातील अधिकारांचा वापर करून प्रभावीपणे अधिनियमाची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. मा. निगम आयुक्त, नागपुर महानगरपालिका, नागपुर यांनी उक्त अधिनियमातील कलम 152 अंतर्गत पारित केलेल्या प्रत्यायोजन आदेश क्र. GAD/13/Del Dt. 08/11/2004 द्वारे खालील सही करणाऱ्यांना उक्त अधिनियमातील कलम 53, 54, 55 व 142 चे अधिकार वापरून कार्य करण्याकरीता प्राधिकृत केलेले आहे. व हा आदेश आज रोजी सुध्दा अस्तित्वात आहे.

ज्याअर्थी नियोजन प्राधिकरण म्हणुन दि. 10/10/2025 ला धरमपेठ झोन क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिका–यांनी मौका चौकशी केलेली असता असे निदर्शनास आलेले आहे कि, आपण आपल्या मालकीच्या महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रा अंतर्गत असलेल्या भुखंड क्र.225A घर क्र. 242, , वार्ड क्र.. , प्रभाग क्र. 15, नगर भुमापन क्र.1123 , शिट नं. ,मौजा–गाडगा , गोकुलपेठ नागपुर तह. व तालुका नागपुर, जिल्हा नागपुर, वर

1. **उक्त अधिनियमानुसार आवश्यक असलेल्या परवानगी शिवाय.**
2. **दिलेल्या परवानगीच्या विरूध्द.**
3. विकासाची दिलेल्या परवानगी रद्द केल्यानंतर.
4. सुधारीत परवानगीचा भंग करून.

अनुसुची मध्ये दर्शविल्याप्रमाणे अनधिकृत व बेकायदेशीर विकास (बांधकाम) सुरू केलेला आहे/हाती घेतलेला आहे/घडवून आणलेला आहे किंवा जमीनीचा वापर बदलविलेला आहे/बदलविण्यास सुरूवात केलेली आहे.


त्याअर्थी आपणास हा नोटीस मिळाल्याच्या **दिनांकापासुन पाच आठवड्याचे** कालावधीत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

1. **सदर्हु भुखंडावरील अनुसुची मध्ये नमुद अनधिकृत व बेकायदेशिर बांधकाम पाडावे.**
2. सदर्हु जमिनीचा अनधिकृत वापर थांबवावा. व अनधिकृत बांधकाम पाडावे.

उपरोक्त आदेशाचे पालन विहित कालावधीत न केल्यास उक्त अधिनियमात नमुद कायदेशीर कार्यवाहीस आपण पात्र ठराल तसेच विहित कालावधीनंतर तुमच्या जबाबदारी व खर्चाने वरील आदेशाची

Scanned with OKEN Scanner

अंमलबजावणी महानगरपालिकेद्वारे करण्यात येईल व याबाबत संबंधीत पोलिसस्टेशनमध्ये आपल्या विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.




:0: अनुसूची :0:

| माळा | मुखंडाच्या/इमारतीच्या अनधिकृत बांधकाम असलेल्या भागाचे विवरण | अनधिकृत बांधकामाचा मोजमापाचे क्षेत्रफळ (चौरस मीटर मध्ये) | शेरा |
|---|---|---|---|
| तळमजला | तात्पुरते शेड | A) 4.50 X 5.50 = 24.75 चौ.मी.<br>B) 3.70 X 11.60 = 42.92 चौ.मी<br>C) 6.60 X 8.00 = 52.80 चौ.मी<br>D) 14.62 X 8.00 = 116.96 चौ.मी | पुर्व दिशेकडील तात्पुरते टिनशेडचे बांधकाम<br>उत्तर दिशेकडील टिनशेडच अनधिकृत बांधकाम<br>पश्चिम दिशेकडील टिनशेडचे अनधिकृत बांधकाम<br>पश्चिम दिशेकडील टिनशेडचे अनधिकृत बांधकाम |
| पहिला मजला | टिनशेड | E) 7.00 X 14.00 = 98.00 चौ.मी | उत्तर दिशेकडील तात्पुरते इमारतीच्या पहिल्या मजल्यावर केलेले टिनशेडचे अनधिकृत बांधकाम |
| एकूण अनधिकृत बांधकाम | | = 335.43 चौ.मी | अनधिकृत बांधकाम पाडून टाकावे |

सहाय्यक आयुक्त
धरमपेठ झोन क्र. 2
नागपूर महानगरपालिका नागपूर

**प्रतिलीपी :-**

1) मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर
2) मा. जिल्हाधिकारी नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर

Scanned with OKEN Scanner